## भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय : महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान जिल्हास्तर योजनेअंतर्गत कामास मनपा हिस्सा ३० टक्के निधी उपयोगात आणणेबाबत..**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान जिल्हास्तर योजनेअंतर्गत जा.क्र.जिवायो/नगरोत्थान/का-४/२०२३-२४/९६३ दि.०५/०३/२०२४ अन्वये शासन निधी अंतर्गत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये खालील नमुद कामास मंजूरी करिता प्रस्ताव सादर करणेकामी मा.जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे. सदर योजनेअंतर्गत मनपा हिस्सा ३० टक्के उपयोगात आणण्याबाबत कळविले आहे. तरी खालील नमुद कामांच्या अंदाजपत्राकिय रक्कमेमध्ये मनपा हिस्सा ३० टक्के उपयोगात आणणेकामीच्या प्रस्तावास मान्यता आवश्यक आहे. तरी उपरोक्त पत्रामधील अनुक्रमांक ७ व ११ कामे खालील प्रमाणे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | शासन हिस्सा | मनपा हिस्सा ३० % |
|---|---|---|---|---|
| ७ | भिवंडी निजामपूर मनपा हद्दीतील भुसार मोहल्ला येथे मच्छी मार्केट उभारणे. | १,९९,८७,४४८/- | १,३९,९१,२१३/- | ५९,९६,२३५/- |
| ११ | भिवंडी निजामपूर मनपा हद्दीतील तीनबत्ती येथे मच्छी मार्केट उभारणे. | २,९९,५८,९६५/- | २,०९,७१,२७५/- | ८९,८७,६९०/- |
| | **एकुण** | **४,९९,४६,४१३/** | **३,४९,७०,४८८/-** | **१,४९,८३,९२५/-** |

मात्रच्या प्रस्तावास मनपा लेखाशिर्ष अंतर्गत ३० टक्के तरतुद करण्यात आली असून, शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी त्यास मान्यता दिलेली आहे. शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४ दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार प्रसाकिय ठराव व निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा.प्रशासक सो. यांना आहेत.

**ठराव क्र.** ४५८ दिनांक :- २३/०७/२०२४

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान जिल्हास्तर योजनेअंतर्गत जा.क्र.जिवायो/ नगरोत्थान/ का -४/२०२३-२४/९६३ दि.०५/०३/२०२४ अन्वये शासन निधी अंतर्गत एकुण २ कामांकरिता एकुण रु. **४,९९,४६,४१३/-** मात्र पैकी मनपा हिस्सा ३० टक्के उपयोगात आणण्याकरीताच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान जिल्हास्तर योजनेअंतर्गत शासन निधी अंतर्गत एकुण २ कामांकरिता एकुण रु. **४,९९,४६,४१३/-** मात्र पैकी मनपा हिस्सा ३० टक्के **रु. १,४९,८३,९२५/-** उपयोगात आणण्याकरीताच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य )**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका